दै. सांय वार्ता दि. २९/०७/२०२२

## पोलीसांचे ऑलआऊट ऑपरेशन

# एका गुन्हेगाराकडून दोन गावठी पिस्तुले आणि एक जीवंत काडतुस जप्त

## अण्णाभाऊ साठे चौक परिसरातील घटना



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड शहरात गावठी पिस्तुले म्हणजेच कट्टे वापरण्याचे गुन्हेगारांचे प्रमाण वाढले असल्याने त्याला प्रतिबंध करण्यासाठी पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांच्या आदेशानुसार बुधवार दि.२७ जुलै रोजी नांदेड शहरातील पोलीसांनी ऑलआऊट ऑपरेशन राबविले.

या दरम्यान अण्णाभाऊ साठे चौक परिसरात तेजिंदरसिंघ मोहनसिंघ टप्पेवाले (वय २३, रा. सखोजीनगर,नांदेड) या संशयीत आरोपीची पोलीसांनी झडती घेतली त्यावेळी त्याच्याकडून दोन गावठी कट्टे आणि एक जीवंत काडतुस हस्तगत करण्यात आले. त्यावेळी तो जबरी चोरी करण्याच्या प्रयत्नात होता. अशी माहिती पोलीसांनी आज एका प्रसिध्दी पत्रकात दिली आहे. ऑलआऊट ऑपरेशन आणि नाकाबंदीसाठी पोलीस अधीक्षक प्रमोदकुमार शेवाळे यांनी सर्व पोलीस ठाण्यांना आपापल्या हद्दीतील रेकॉर्ड वरील गुन्हेगारांना चेक करुन कार्यवाहीचे आदेश दिले होते. त्यानुसार शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने वरील कारवाई केली. शिवाजीनगर ठाण्याचे पो.नि. नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली ही कार्यवाही करण्यात आली. अप्पर पोलीस अधीक्षक निलेश मोरे व विजय कबाडे, उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रसेन देशमुख आणि पो.नि.नितीन काशीकर यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे प्रभारी सपोनी वाहुळे, पोउपनि सोनकांबळे, पोहेकॉ इब्राहीम, पोना रवी बामणे, पोना दिलीप राठोड, पोलीस शिपाई देविसिंग सिंगल, पोलीस शिपाई शेख अजहर, पोलीस शिपाई दता वडजे यांनी ही कामगिरी पार पाडली.